डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



व

पी.ई.एस.मुंबईचे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,

नागसेनवन, औरंगाबाद (महा.)

यांच्या संयुक्त विद्यमान

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

# Recent Trends In Teaching & Research : Opportunities, Nature and Features

# आधुनिक अध्यापन संशोधनाचे प्रवाह : संधी, स्वरुप व वैशिष्ट्ये

दिनांक : ३ ऑक्टोबर २०१५

भाग - २

AJANTA PRAKASHAN

 ISBN : 978-93-83587-33-9

# मराठी अनुक्रमाणिका भाग - २


| अ.क्र. | नाव आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मैदानी खेळाच्या स्पर्धा, संयोजन आणि नवे प्रयोग<br>**प्रा. मधुकर पांडुरंग वाकळे**<br>**प्रा. सचिन शिवाजीराव देशमुख** | १-२ |
| २ | पालि साहित्यातील तत्वज्ञान काळाची गरज<br>**डॉ. अशोक राजाराम केवटे** | ३-६ |
| ३ | लोकसाहित्याचे अध्यापन आणि संशोधन<br>**डॉ. नवनाथ ना. गोरे** | ७-१० |
| ४ | क्रीडा क्षेत्रातील अध्यापन व संशोधन<br>**प्रा. मधुकर पांडुरंग वाकळे**<br>**श्रीमती संगीता जगन्नाथ साठे (वाकळे)** | ११-१२ |
| ५ | जागतिक तापमानवाढ आरोग्य, लोक सहभाग आणि पर्यावरण संरक्षण<br>**श्रीमती. माया वंजारे** | १३-१४ |
| ६ | जातीअंत आणि स्त्रिमुक्ती<br>**डॉ. संजय शंकरराव दारवंडे** | १५-१६ |
| ७ | नाटक या विषयाची अध्यापन पध्दती व संषोधन प्रध्दती : एक अभ्यास<br>डॉ. संयुक्ता थोरात | १७-२० |
| ८ | मैदानी खेळाच्या स्पर्धा, संयोजन व माझे प्रयोग<br>**गायसमद्रे सुनिल नारायणराव** | २१-२४ |
| ९ | जागतिर्कीकरण आणि भाषिक कौशल्ये<br>**प्रा. डॉ. संजय शिंदे** | २५-२८ |
| १० | आधुनिक भारतातील शिक्षण, रोजगार आणि दारिद्रय निर्मुलनाची सद्यस्थिती<br>**प्रा. किर्तीकर वाल्मीक भीमराव** | २९-३६ |
| ११ | महिला आणि पत्रकारिता<br>मनिषा ज्ञानदेव ढास | ३७-३८ |
| १२ | प्रादेशिक वृत्तपत्राचे बदलते स्वरूप<br>संजय शहादेव भारसाखळे | ३९-४० |
| १३ | माहिती तंत्रज्ञान व वार्ताकनातील बदल<br>गाथा रवीकिरण वाघमारे | ४१-४२ |
| १४ | मानसशास्त्रातील संशोधन : व्याप्ती व महत्त्व शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद<br>**लामतुरे दिक्षा मंचकराव** | ४३-४५ |

ISBN : 978-93-83587-33-9


# मराठी अनुक्रमाणिका भाग - २



| अ.क्र. | नाव आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | अध्ययन व अध्यापन व पर्यावरणातील प्रयोगात्मकता<br>**कविता ज्ञानेश्वर सोनुने** | ४६-४९ |
| १६ | आधुनिक मराठी कथेचे अध्यापन : स्वरुप आणि वैशिष्टये<br>**डॉ. मधुकर दगडुदेव क्षीरसागर** | ५०-५६ |
| १७ | भाषेच्या अध्यापनातील तंत्रे व माझे प्रयोग<br>**प्रा. डॉ. रावसाहेब उत्तमराव चव्हाण** | ५७-६० |
| १८ | इंचेऑन घोषणापत्र व शिक्षक<br>**प्रा. विजयकुमार पाईकराव** | ६१-६३ |
| १९ | पाली भाषा उत्पत्ती, विकास आणि तथागत बुद्धांची नैतिक शिकवण<br>**खिल्लारे शंकर अर्जुन** | ६४-६६ |
| २० | सोशल मिडिया आणि भाषा व्यवहार<br>**प्रा. प्रवीण घोडेस्वार** | ६७-६९ |
| २१ | मराठी ग्रामीण कवितेतून चित्रित झालेला शेतकरी<br>**प्रा. डॉ. बाबासाहेब बा. लिहिणार** | ७०-७२ |
| २२ | सामाजिक सुख-दुखा:चा आलेख चितारणारे दलित कथाकार<br>**डॉ. रेखा नारायणराव वाघ** | ७३-७५ |
| २३ | सिकलसेल आजार एक आधुनिक सामाजिक समस्या<br>**राजपुत विलास भरतसिंग** | ७६-७९ |
| २४ | अध्यापक महाविद्यालयातील सरावपाठ उपक्रमाच्या अंमलबजावणीचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. देवकाते भाऊसाहेब श्रीपतराव** | ८०-८२ |
| २५ | 'शांतता शिक्षण'एक परिचय<br>**प्रा. मोटे गीतांजली राजेंद्र** | ८३-८५ |
| २६ | कृषिक्षेत्र व विदेशी व्यापारामध्ये जागतीकीकरणाची भूमिका<br>**डॉ. मुरलीधर कुंडलीक इंगोले** | ८६-९१ |
| २७ | भारतातील आधुनिक सामाजिक समस्या<br>**प्रा. विजय निळकंठ संबळे** | ९२-९६ |
| २८ | जागतिकीकरणात मराठी भाषा व साहित्यातील परिवर्तने<br>**प्रा. युवराज धबडगे** | ९७-९८ |
| २९ | नाट्य कलेतील अध्यापनाचे संशोधन स्वरूप व वैशिष्ट्ये<br>**डॉ. वैशाली केशव बोटेले** | ९९-१०२ |

 ISBN : 978-93-83587-33-9

# - २० -

# सोशल मिडिया आणि भाषा व्यवहार

**प्रा. प्रवीण घोडेस्वार**
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, गोवर्धन, नाशिक.

आधुनिक जगात सर्वत्र आणि सर्वव्यापी झालेले माध्यम म्हणजे सोशल मिडिया. या माध्यमाने संपूर्ण जगावर गारूड केले आहे. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सोशल मिडिया वापरणाऱ्यांची संख्या काही कोटीत पोहचलेली दिसून येतेय जी की नव्वदच्या दशकात फक्त काही लाख होती. या माध्यमाला समाजाच्या सर्वच स्तरांवरून स्वीकारण्याच्या गतीचा वेग स्तिमित करणारा आहे. एवढ्या कमी कालावधीत आणि इतक्या मोठ्या प्रमाणात आजवर कोणत्याही माध्यमाला लोकांनी आपलेसे केल्याचे उदाहरण सापडत नाही. व्यापार ते राजकारण, सर्वसामान्य माणूस ते बडे प्रस्थ, सामाजिक कार्यकर्ते ते सरकार सर्वांनी सोशल मिडीयाचा अनिवार्य म्हणून स्वीकार केलेला दिसून येतो. सोशल मिडीयाचा वापर करणा–यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. यामुळे लोकांमधले नातेसंबंध आणि व्यवहार यातही बदल घडताना दिसत आहेत. संवादाचा सामाजिक परीघ द्रुत गतीने वाढत आहे. मुद्रण तंत्राचा शोध लागल्यानंतरचा क्रांतीकारक बदल म्हणून सोशल मिडियाकडे पाहता येईल.

एक गोष्ट या ठिकाणी विसरता कामा नये. तंत्रज्ञानाच्या वापराने भाषेवर खूप परिणाम झालेला आहे. कागदावर जेव्हा आपण लिहीत असतो तेव्हा मनात जे आहे ते आपण लिहिण्याचा प्रयत्न करतो. जो शब्द मनात आहे तोच वापरण्याचा प्रयत्न करतो. पुन्हा–पुन्हा खोडणे, दूरुस्त्या करणे आणि मग समर्पक शब्द सापडल्यावर तो वापरण्याचे स्वातंत्र्य लिहिणाऱ्या व्यक्तीकडे होते. मात्र जेव्हापासून संगणक वा संचजवच वर थेट लिहिण्याची संधी उपलब्ध झाली तेव्हापासून लेखनाचे ते स्वातंत्र्य हिरावले गेले. जेव्हा पासून कागद पेनाने लिहिणे बंद केले तेव्हापासून जर एखादे पान लिहावे लागले तर हाताच्या मांसपेशी दुखायल्या लागल्याचा व्यापक अनुभव दिसून येतो. अशा परिस्थिती ज्यांची बोटे फक्त संगणक किवा संचजवच वर चालतात अशा लहान मुले आणि विद्यार्थी यांच्यासाठी हे हानीकारक आहे. याचे कारण म्हणजे अजूनही आपल्याकडे शाळा– कॉलेजच्या परीक्षा कागदावर लिहूनच द्याव्या लागतात.

आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत भाषा आपली सोबत करत असते. आपण कोणतीही भाषा आचरणात आणत असलो तरी तिचा उपयोग आपल्या पद्धतीने करीत असतो. भाषा जरी एक असली तरी प्रत्येकाची ती भाषा बोलण्याची–लिहिण्याची आपली स्वतःची अशी एक शैली असते. फार तर प्रत्येकाची ढब असते असे म्हणता येईल. जी भाषा आपल्या जीवनाच्या शेवटापर्यंत साथ देत असते त्या भाषेचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी ,सौंदर्य,चारित्र्य जपण्यासाठी आपण काही करतो का? यात आपण काही योगदान देतो का? या सारखे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होऊ शकतात. प्रथमतरू भाषेला एक चारित्र्य असतं, हे ध्यानात घ्यायला हवे. भाषेचे अभ्यासक–विद्वान–समीक्षक यांच्या मते भाषा ही वाहत्या पाण्यासारखी असते. ती [illegible] आपल्या गतीने वाहत असते. परिवर्तनीय आणि प्रवाहीत राहणं हाच भाषेचा स्थायीभाव आणि नियती आहे. काळानुरूप भाषेत बदल घडून येतात. समाज, परिस्थिती, व्यक्ती इत्यादींना अनुसरून भाषा आपले रंग–रूप बदलत असते. एकूणच भाषा या भाषेवर प्रकाश टाकल्यास बऱ्याच मनोवेधक बाबी समोर येतात. भाषेच्या बदलत्या स्वरूपाचे दर्शन भाषा विज्ञान घडवत असते तर दुसरीकडे आपल्या दैनंदिन बोलण्यातूनही भाषेच्या वेगवेगळ्या छटा दिसून येतात. वऱ्हाडी–वैदर्भीय, अहिराणी–खानदेशी,